२५५

वाचा :- इकडील परिपत्रक क्र. सिटीएस सी आर 6265/ना.भू.4/99, दिनांक 1/1/2000.

37

क्र. सिटीएस सीआर 6265/ना.भू.4/2001.
जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर,
पुणे, दिनांक :- 10/9/2001

**विषय :- नगर भूमापन हद्दीतील मिळकतींचे पुनर्विलोकनाचे परिमाणाबाबत.**

परिपत्रक :-

इकडील परिपत्रक क्र. सिटीएस सिआर 6265/ना.भू.4/99, दिनांक 1/1/2000 ने नगर भूमापन हद्दीतील मिळकतींचे पुनर्विलोकन कामाबाबत सविस्तर सुचना दिलेल्या आहेत.

वरील परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक **3.1** मध्ये परिरक्षण भूमापकाने दरमहा 200 मिळकतींचे पुनर्विलोकनाचे काम करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत; परंतु परिरक्षण भूमापक यांचेकडील अन्य कामांचा विचार करता आता दरमहा 200 मिळकतींचे पुनर्विलोकन काम करणेऐवजी दरमहा 100 मिळकतींचे पुनर्विलोकन काम करणेबाबत या परिपत्रकाद्वारे सुचना देणेत येत आहेत.

दिनांक 1/1/2000 चे परिपत्रकातील इतर सर्व मुद्याबाबतच्या सुचना पूर्वीप्रमाणेच कायम असून त्याचे काटेकोरपणे पालन करणेचे आहे.

**सदर परिपत्रकाची अंमलबजावणी तात्काळ होणेची आहे.**

सही/- (मोहन फडतरे)
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक,**
**भूमि अभिलेख (म. राज्य) पुणे.**

**प्रत :-**

1) उपसंचालक भूमि अभिलेख (सर्व).
2) अधीक्षक भूमि अभिलेख (सर्व).
3) तालुका निरीक्षक भूमि अभिलेख (सर्व).
4) नगर भूमापन अधिकारी (सर्व).
5) कार्यालय अधीक्षक, जमाबंदी आयुक्त, कार्यालय पुणे.
6) प्राचार्य, भूमि अभिलेख प्रशिक्षण शाळा, औरंगाबाद.

" निर्गमित "

(प्र. दा. पाटील)
उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
**जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन)**

10 SEP 2001

CR 2001112313

(२५६)

क्र./सीआर १०९८/भू-३/२००१,
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म.राज्य)यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला,
विधानभवनासमोर, पुणे -४११ ००१.
दिनांक :- /११/२००१.
23 NOV 2001

विषय :- न्यायालयीन फी मुद्रांकच्या दरामध्ये बदल.

परिपत्रक

मुंबई न्यायालयीन फी अधिनियम १९५९ चे संदर्भात महाराष्ट्र अध्यादेश क्र. ३०/२००१, दि.२८/९/२००१ अन्वये (महाराष्ट्र राजपत्र असाधारण २८ सप्टेंबर २००१ पृष्ठ क्र.७३८ व ७३९) विभागाकडे प्राप्त होणा-या विविध प्रकारचे अर्जास न्यायालयीन फी (कोर्ट फी स्टॅम्प) दि.१/१०/२००१ पासून सुधारीत दर लागू करणेत आलेले आहेत. त्याची अंमलबजावणी विभागामधील सर्व अधिनस्त कार्यालयामधून अंमलात आणली गेली असावी. अशी इकडील धारणा आहे. ती पृष्ठांकित करणेत यावी. वाढीव दर खालीलप्रमाणे असे.

| अ.नं. | अर्जाचा प्रकार | न्यायालयीन फी मुद्रांक चे सुधारीत दर (रुपये) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | नक्कलेसाठी | ५(पाच) |
| २. | शोध घेणेसाठी | ५(पाच) |
| ३. | मोजणी/तक्रार/फेरफार नोंदीसाठी | ५(पाच) |
| ४. | मुखत्यार/वकीलपत्र | १०(दहा) |
| ५. | अपील/फेरतपासणी/पुनर्विलोकन अर्ज | ५०(पन्नास) |

दि.१/१०/२००१ पासुन सुधारित दर लागू करणेत आले असून त्यानुसार आपले कार्यालयांत व आपले अधिनस्त कार्यालयांत जरुर ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.या सुधारणेबाबतच्या सुचना जनतेच्या माहितीसाठी सर्व कार्यालयांचे सुचना फलकावर लावणेत याव्यात.

(स्वाक्षरी/-डॉ.सुधीरकुमार गोयल)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म.राज्य)

प्रत/- उपसंचालक भूमि अभिलेख,सर्व यांना माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत/- अधीक्षक भूमि अभिलेख सर्व यांना माहिती व कार्यवाहीसाठी

२/- आपले अधिनस्त तालुका निरीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी सर्व यांना दयावयाच्या जादा प्रतीसह.

आपले अधिनस्त कार्यालयांस परिपत्रकाच्या प्रती पुरवून तसे इकडे ज्ञात करावे.

प्रत/-उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (सर्वसाधारण) (भूमापन) (नागरी भूमापन) (एकत्रीकरण ) यांना माहितीसाठी.

प्रत/- कार्यालय अधीक्षक (सर्व)जमाबंदी आयुक्त कार्यालय,पुणे यांना माहितीसाठी.